**27.11.2025** प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

" गोड मुलांनो - बाबा जे शिकवत आहेत, ते चांगल्या प्रकारे शिका म्हणजे २१ जन्मांकरिता सोर्स ऑफ इन्कम होईल, कायमचे सुखी बनाल"

प्रश्नः- तुम्हा मुलांच्या अतींद्रिय सुखाचे गायन का आहे?

उत्तरः- कारण तुम्ही मुले यावेळी बाबांना जाणता, तुम्हीच बाबांद्वारे सृष्टीच्या आदि-मध्य-अंताला जाणले आहे. तुम्ही आता संगमावर बेहदमध्ये उभे आहात. तुम्ही जाणता आता आपण या खाऱ्या नदीतून, अमृताच्या गोड नदीमध्ये जात आहोत. आम्हाला स्वयं भगवान शिकवत आहेत, हा आनंद ब्राह्मणांनाच असतो म्हणूनच अतींद्रिय सुख तुमच्यासाठीच गायले गेले आहे.

ओम् शांती. रुहानी बेहदचे बाबा रूहानी बेहदच्या मुलांप्रती सांगत आहेत - अर्थात आपले मत देत आहेत. हे तर जरूर समजता की आपण जीव आत्मे आहोत. परंतु स्वतःला आत्मा असल्याचे निश्चित करायचे आहे. हे काही आम्ही नवीन शाळा शिकत नाही आहोत. दर ५ हजार वर्षानंतर शिकत आलो आहोत. बाबा विचारतात ना - या अगोदर कधी शिकण्याकरिता आला आहात का? तर सर्वजण म्हणतात - आम्ही दर ५ हजार वर्षानंतर पुरुषोत्तम संगमयुगावर बाबांकडे येतो. हे तरी लक्षात असेल ना की हे देखील विसरता? स्टुडंटला स्कूल तर जरूर आठवेल ना. एम ऑब्जेक्ट तर एकच आहे. जी पण मुले बनतात मग तो दोन दिवसांचा मुलगा असेल किंवा जुना असेल परंतु एम ऑब्जेक्ट तर एकच आहे. कोणालाही घाटा होऊ शकत नाही. शिक्षणामध्ये इन्कम आहे. ते (दुनियावाले) देखील ग्रंथ वाचून दाखवतात तर कमाई होते, लगेचच शरीर निर्वाहासाठी कमाई होईल. साधू बनला, एक-दोन शास्त्रे बसून ऐकवली, कमाई होईल. आता हे सर्व सोर्स ऑफ इन्कम आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये इन्कम पाहिजे ना. पैसे असतील तर कुठेही फिरून या. तुम्ही मुले जाणता - बाबा आपल्याला खूप चांगले शिक्षण शिकवत आहेत, त्याद्वारे २१ जन्मांचे इन्कम मिळते. हे इन्कम असे आहे जे आपण कायमचे सुखी बनतो. कधी आजारी पडणार नाही, कायमचे अमर होणार. असा निश्चय केला पाहिजे. अशा प्रकारे निश्चय केल्याने तुम्हाला उल्हास येईल. नाहीतर कोणत्या ना कोणत्या गोष्टीमध्ये घुसमट होत राहील. आतल्याआत हे चिंतन केले पाहिजे - आपण बेहदच्या बाबांकडून शिकत आहोत. भगवानुवाच - ही तर गीता आहे. गीतेचे देखील युग आता आहे ना. फक्त विसरले आहेत - हे आहे पाचवे युग. हे संगमयुग खूप छोटे आहे. खरेतर चौथा हिस्सा देखील म्हणता येणार नाही. टक्केवारी काढू शकता. ते देखील पुढे चालून बाबा सांगत राहतील. थोडेफार बाबांनीही सांगण्याची नोंद तर आहे ना. तुम्हा सर्व आत्म्यांमध्ये पार्ट नोंदलेला आहे जो रिपीट होत आहे. तुम्ही जे शिकत आहात ते देखील रिपीटेशन (पुनरावृत्तीच) आहे ना. या पुनरावृत्तीच्या रहस्या विषयी तुम्हा मुलांना ठाऊक झाले आहे. पावलो-पावली पार्ट बदलत जात आहे. एक सेकंद दुसऱ्याशी मेळ खाऊ शकत नाही. उवे प्रमाणे टिक-टिक चालू राहते. टिक झाले सेकंद पास झाला. आता तुम्ही बेहदमध्ये उभे आहात. दुसरा कोणताही मनुष्य मात्र बेहदमध्ये उभा नाही आहे. कोणालाही बेहदचे अर्थात आदि-मध्य-अंताचे नॉलेज नाही आहे. आता तुम्हाला फ्युचर विषयी देखील माहित आहे. आपण नवीन दुनियेमध्ये जात आहोत. हे आहे संगमयुग, ज्याला क्रॉस करायचे आहे. खारी नदी आहे ना. ही आहे गोड-गोड अमृताची नदी. ती आहे विषाची नदी. आता तुम्ही विषाच्या सागरातून क्षीरसागरामध्ये जाता. ही आहे बेहदची गोष्ट. दुनियेमध्ये या गोष्टींबद्दल काहीच ठाऊक नाही आहे. नवीन गोष्ट आहे ना. हे देखील तुम्ही जाणता भगवान कोणाला म्हटले जाते. ते काय पार्ट बजावतात. टॉपिकमध्ये देखील सांगता ना, याल तर आम्ही तुम्हाला परमपिता परमात्म्याची बायोग्राफी समजावून सांगू. असे तर मुले वडिलांची बायोग्राफी सांगतात. कॉमन आहे. हे तर मग पित्यांचेही पिता आहेत ना. तुमच्यामध्ये देखील नंबरवार पुरुषार्था नुसार जाणतात. आता तुम्हाला यथार्थ रीतीने बाबांचा परिचय द्यायचा आहे. तुम्हाला देखील बाबांनी परिचय दिला आहे तेव्हाच तर सांगता ना, बाकीचे तर कोणी बेहदच्या बाबांना जाणू शकत नाहीत. तुम्हाला देखील संगमावरच माहिती होते. मनुष्य मात्र देवता असो, किंवा शूद्र असो, पुण्य आत्मा असो, पाप आत्मा असो, कोणीही जाणत नाहीत, केवळ तुम्ही ब्राह्मण जे संगमयुगावर आहात, तुम्हालाच माहित झाले आहे. तर तुम्हा मुलांना किती आनंद झाला

पाहिजे. तेव्हाच तर गायन देखील आहे - 'अतींद्रिय सुख विचारायचे असेल तर गोप-गोपींना विचारा'.

हे बाबा पिता देखील आहेत, टीचर, सद्‌गुरु देखील आहेत, 'सुप्रीम' शब्द तर जरूर घालायचा आहे. कधी-कधी मुले विसरून जातात. या सर्व गोष्टी मुलांच्या बुद्धीमध्ये राहिल्या पाहिजेत. शिवबाबांच्या महिमेमध्ये हे शब्द जरूर घालायचे आहेत. तुमच्याशिवाय बाकीचे इतर कोणी जाणत सुद्धा नाहीत. तुम्ही समजावून सांगू शकता तर तुम्ही जणू जिंकलात ना. तुम्ही जाणता बेहदचे बाबा सर्वांचे शिक्षक, सर्वांचे सद्‌गती दाता आहेत. बेहदचे सुख, बेहदचे ज्ञान देणारे आहेत. तरीही अशा बाबांना विसरून जाता. माया किती समर्थ आहे. ईश्वराला तर समर्थ म्हटले जाते परंतु माया देखील काही कमी नाही आहे. तुम्ही मुले आता ॲक्युरेट जाणता - याचे तर नावच ठेवले आहे रावण. राम राज्य आणि रावण राज्य, यावर देखील अगदी अचूकपणे समजावून सांगितले पाहिजे. राम राज्य आहे तसेच जरूर रावण राज्य देखील आहे. कायमचे राम राज्य तर असू शकत नाही. राम राज्य, श्रीकृष्णाचे राज्य कोण स्थापन करतात, हे बेहदचे बाबाच बसून समजावून सांगतात. तुम्ही भारत खंडाची खूप महिमा केली पाहिजे. भारत सचखंड होता, किती महिमा होती. बनवणारे बाबाच आहेत. तुमचे बाबांवर किती प्रेम आहे. एम ऑब्जेक्ट बुद्धीमध्ये आहे. हे देखील जाणता - आम्हा स्टूडंटना आपल्या शिक्षणाचा अभिमान वाटला पाहिजे. कॅरॅक्टर बद्दल देखील काळजी घेतली पाहिजे. विवेक म्हणतो जेव्हा की हे गॉडली शिक्षण आहे तर त्याला एकही दिवस मिस करता कामा नये आणि टीचर आल्यानंतर उशिरा देखील पोहोचायचे नाही. टीचर आल्यानंतर येणे हा देखील एक इन्सल्ट आहे. शाळेमध्ये देखील उशिराने येतात तर त्यांना टिचर बाहेर उभे करतात. बाबा आपल्या बालपणीचे उदाहरण सुद्धा सांगतात. आमचे शिक्षक तर खूप कडक होते. वर्गात येऊ सुद्धा देत नसत. इथे तर खूप आहेत जे उशिराने येतात. सेवा करणारा सपूत बच्चा जरूर बाबांना प्रिय वाटतो ना. आता तुम्ही समजता - आदि सनातन देवी-देवता धर्म तर हा होता ना. यांचा धर्म कधी स्थापन करण्यात आला. जरा देखील कोणाच्या बुद्धीमध्ये नाहीये. तुमच्या बुद्धीतून देखील वारंवार निसटते. तुम्ही आता देवी-देवता बनण्यासाठी पुरुषार्थ करत आहात. कोण शिकवत आहेत? स्वयं परमपिता परमात्मा. तुम्ही समजता आपले हे ब्राह्मण कुळ आहे, डिनायस्टी (घराणे) नसते. हे आहे सर्वोत्तम ब्राह्मण कुळ. बाबा देखील सर्वोत्तम आहेत ना. उच्च ते उच्च आहेत तर त्यांच्या द्वारे कमाई देखील उच्च आहे. त्यांनाच 'श्री-श्री' म्हटले जाते. तुम्हाला देखील श्रेष्ठ बनवतात. तुम्ही मुलेच जाणता की, आपल्याला श्रेष्ठ बनविणारा कोण आहे? बाकीचे कोणीही काहीच समजत नाहीत. तुम्ही म्हणाल - 'आमचे बाबा, पिता देखील आहेत, टीचर देखील आहेत, सद्‌गुरु देखील आहेत, शिकवत आहेत'. आपण आत्मे आहोत. आम्हा आत्म्यांना बाबांनी स्मृति दिली आहे, तुम्ही माझी संतान आहात. ब्रदरहुड (बंधुभाव) आहे ना. बाबांची आठवण देखील करता. समजता ते निराकारी पिता आहेत तर जरूर आत्म्याला देखील निराकारच म्हणणार. आत्माच एक शरीर सोडून दुसरे घेते. मग पार्ट बजावते. मनुष्य मग स्वतःला आत्मा समजण्या ऐवजी शरीर समजतात. 'मी आत्मा आहे', हे विसरून जातात. मी कधी विसरत नाही. तुम्ही सर्व आत्मे शाळीग्राम आहात. मी आहे परमपिता अर्थात परम-आत्मा. यापेक्षा मोठे दुसरे कोणते नाव नाही आहे. त्या परम-आत्म्याचे नाव आहे - शिव. तुम्ही देखील असेच आत्मे आहात परंतु तुम्ही सर्व शाळीग्राम आहात. शिवाच्या मंदिरामध्ये जाता, तिथे देखील खूप शाळीग्राम ठेवतात. शिवाची पूजा करतात तर त्यांच्यासोबत शाळीग्रामची देखील पूजा करतात ना. म्हणून बाबांनी सांगितले होते की तुमची आत्मा आणि शरीर दोन्हीची पूजा होते. माझी तर फक्त आत्म्याचीच होते. शरीर नाही आहे. तुम्ही किती श्रेष्ठ बनता. बाबांना तर आनंद होतो ना. वडील गरीब असतात, मुले शिकून किती मोठी बनतात. कोणा पासून कोण बनतात. बाबा देखील जाणतात तुम्ही किती श्रेष्ठ होता. आता किती ऑरफन (अनाथ) बनला आहात, बाबांनाच ओळखत नाही आहात. आता तुम्ही बाबांचे बनला आहात तर साऱ्या विश्वाचे मालक बनता.

बाबा म्हणतात, मला तुम्ही म्हणताच मुळी - हेवनली गॉड फादर. हे देखील तुम्हीच जाणता की, आता स्वर्गाची स्थापना होत आहे. तिथे काय-काय असेल - हे तुमच्या व्यतिरिक्त इतर कोणाच्याही बुद्धीमध्ये नाही आहे. तुमच्या बुद्धीमध्ये आहे की, आपण विश्वाचे मालक होतो, आता पुन्हा बनत आहोत. प्रजा देखील असेच म्हणणार ना की आम्ही मालक आहोत. या गोष्टी तुम्हा मुलांच्याच बुद्धीमध्ये आहेत तर आनंद वाटला पाहिजे ना! या गोष्टी ऐकून मग इतरांना देखील सांगायच्या आहेत, म्हणून सेंटर किंवा म्युझियम उघडत राहतात. जे कल्पापूर्वी झाले होते तेच होत राहील. म्युझियम, सेंटर्स इत्यादींसाठी तुम्हाला खूप ऑफर करतील, मग त्यातून खूपजण ज्ञानात येतील. सर्वांची हाडे नरम होत जातील. आता तुम्ही साऱ्या दुनियेची हाडे नरम करत जाता.

तुमच्या योगबळामध्ये किती जबरदस्त ताकद आहे. बाबा म्हणतात - तुमच्यामध्ये खूप ताकद आहे. भोजन तुम्ही योगामध्ये राहून बनवा, खाऊ घाला, तर बुद्धी बाबांकडे ओढ घेईल. भक्तीमार्गामध्ये तर गुरु लोकांचे उष्टे सुद्धा खातात. तुम्ही मुले समजता भक्तिमार्गाचा विस्तार तर खूप आहे, त्याचे वर्णन करू शकत नाही. हे बीज आणि ते झाड आहे (ज्ञान आहे बीज आणि भक्ती आहे झाड). बीजाचे वर्णन करू शकता. बाकी कोणाला झाडाची पाने मोजायला सांगा, तर मोजू शकणार नाहीत. असंख्य पाने असतात. बीजामध्ये तर पानांच्या खुणा दिसत नाहीत. आश्चर्य आहे ना. याला देखील कुदरत म्हणता येईल. जीव-जंतू किती वंडरफुल (अद्भुत) आहेत. अनेक प्रकारचे किडे आहेत, कसे पैदा होतात, अतिशय वंडरफुल ड्रामा आहे, याला म्हटलेच जाते नेचर (निसर्ग). हा देखील पूर्व-नियोजित खेळ आहे. सतयुगामध्ये काय-काय पाहाल. त्या देखील नवीन गोष्टी असतील, सर्वकाही नवीन असते. मोरासाठी तर बाबांनी सांगितले आहे त्याला भारताचा राष्ट्रीय पक्षी म्हणतात कारण श्रीकृष्णाच्या मुकुटामध्ये मोराचे पीस दाखवतात. मोर आणि लांडोर खूप सुंदरही असतात. गर्भ धारणा देखील अश्रूंच्या द्वारे होते. म्हणून नॅशनल बर्ड (राष्ट्रीय पक्षी) म्हणतात. असे सुंदर पक्षी परदेशातही आढळतात.

आता तुम्हा मुलांना साऱ्या सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे रहस्य समजावून सांगितले आहे जे इतर कोणीही जाणत नाहीत. बोला, आम्ही तुम्हाला परमपिता परमात्म्याची बायोग्राफी (जीवन चरित्र) सांगतो. रचता आहेत तर जरूर त्यांची रचना देखील असेल. त्यांचा इतिहास-भूगोल आम्ही जाणतो. उच्च ते उच्च बेहदच्या बाबांचा कोणता पार्ट आहे हे आम्ही जाणतो, दुनिया तर काहीच जाणत नाही. ही खूप छी-छी (विकारी) दुनिया आहे. यावेळी सौंदर्य देखील एक समस्या आहे. मुलींना बघा कसे पळवून नेतात. तुम्हा मुलांना या विकारी दुनियेचा तर तिरस्कार वाटला पाहिजे. ही पतित दुनिया आहे, पतित शरीर आहे. आपल्याला तर आता बाबांची आठवण करून आपल्या आत्म्याला पवित्र बनवायचे आहे. आपण सतोप्रधान होतो, सुखी होतो. आता तमोप्रधान बनलो आहोत तर दुःखी आहोत; आता पुन्हा सतोप्रधान बनायचे आहे. तुम्हाला वाटते आपण पतितापासून पावन बनावे. भले गातात देखील - 'पतित-पावन', परंतु जुन्या दुनियेचा अजिबात तिटकारा येत नाही. तुम्ही मुले समजता - ही छी-छी (पतित) दुनिया आहे. नवीन दुनियेमध्ये आपल्याला शरीर देखील गुल-गुल (सुंदर) मिळेल. आपण आता अमरपुरीचे मालक बनत आहोत. तुम्हा मुलांनी सदैव आनंदी, हर्षितमुख राहिले पाहिजे. तुम्ही अतिशय गोड मुले आहात. बाबा ५ हजार वर्षानंतर त्याच मुलांना येऊन भेटतात. तर जरूर आनंद होईल ना. मी पुन्हा आलो आहे मुलांना भेटण्यासाठी. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) आपण गॉडली स्टुडंट (ईश्वरीय विद्यार्थी) आहोत, त्यामुळे शिक्षणाचा नशा देखील असावा तसेच आपल्या कॅरॅक्टरवर सुद्धा (चारित्र्यावरही) लक्ष असावे. एकही दिवस अभ्यास (मुरली क्लास) चुकवायचा नाही. उशिराने क्लासमध्ये येऊन टीचरचा इन्सल्ट करायचा नाही.

२) या विकारी, छी-छी दुनियेचा तिटकारा वाटला पाहिजे, बाबांच्या आठवणीने आपल्या आत्म्याला पवित्र सतोप्रधान बनविण्याचा पुरुषार्थ करायचा आहे. सदैव आनंदी, हर्षितमुख राहायचे आहे.

वरदान:- होपलेस मध्ये देखील होप निर्माण करणारे खरे परोपकारी, संतुष्टमणी भव

त्रिकालदर्शी बनून प्रत्येक आत्म्याच्या कमी-कमजोरीला ओळखून, त्यांच्या कमजोरीला स्वतःमध्ये धारण करण्याऐवजी किंवा वर्णन करण्याऐवजी कमजोरी रुपी काट्याला कल्याणकारी स्वरूपा द्वारे समाप्त करणे, काट्याला फूल बनवणे; स्वतः देखील संतुष्टमणी प्रमाणे संतुष्ट राहणे आणि सर्वांना संतुष्ट करणे; ज्यांच्या प्रति सर्व निराशा दर्शवतात, अशी व्यक्ती किंवा अशा स्थितीमध्ये नेहमीसाठी आशेचे दीपक जागृत करणे अर्थात निराश असणाऱ्याला शक्तिशाली बनविणे - असे श्रेष्ठ कर्तव्य करत रहाल तर परोपकारी, संतुष्टमणीचे वरदान प्राप्त होईल.

बोधवाक्य:- परीक्षेच्या वेळी केलेली प्रतिज्ञा आठवली पाहिजे तेव्हा प्रत्यक्षता होईल.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे**:-** अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा**.**

संपूर्ण दिवसभरामध्ये अधून-मधून एक सेकंद जरी मिळाला, तरी वारंवार हा विदेही बनण्याचा अभ्यास करत रहा. दोन-चार सेकंद तरी काढा, यामुळे खूप मदत मिळेल. नाही तर संपूर्ण दिवस बुद्धी चालत राहते, त्यामुळे विदेही बनण्यामध्ये वेळ लागतो; आणि जर अभ्यास असेल तर जेव्हा पाहिजे त्याच वेळी विदेही बनाल कारण अखेरीला सर्वकाही अचानक होणार आहे. तर अचानकच्या पेपर मध्ये हा विदेहीपणाचा अभ्यास अतिशय गरजेचा आहे.